NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २५.११.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २४.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण १,३४,६९०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, महा. जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ७७,५१६/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे, दिनांक २४.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २५.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ३४ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ८० केसेस, नो पार्किंग कलम २२(१)(२)/१७७ मोवाका अन्वये ०६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २०० केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २२ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १३७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ११ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१२६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये २६ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २८ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९५२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,३१,८७९/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :– एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक २५.११.२०२६ चे ०३.५० वा. ते ०७.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकातीचे अधिकारी व अंमलदार हे अंमली पदार्थ विक्री करणारे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत न्यु नंदनवन, कार्पोरेशन पाण्याचे टाकीसमोर सार्वजनिक रोडवर एका सुझुकी एक्सेस मोपेडसह काही ईसम एम.डी पावडर विक्रीकरीता बसून आहेत. अशा

मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावून पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाची मोपेडसह ०३ इसम संशयीत रित्या दिसुन आले. तेथे एक बर्गमन गाडीचालक त्यांचे जवळ आला व त्याने त्यांना काहितरी दिले. पोलीसांचे पथक त्यांचेकडे जात असतांना बर्गमन गाडीचालकास चाहुल लागल्याने तो पळुन गेला. ०३ इसम आपले मोपेडने पळुन जाण्याचे तयारीत असतांना, त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता, त्यांनी १) शेख समीर शेख शब्बीर, वय २१ वर्षे, रा. जामा मस्जीद जवळ, हसनबाग, नंदनवन, नागपूर २) शेख माज अब्दुल सत्तार, वय २१ वर्षे, रा. टिमकी, काळ्या झेंड्यासमोर, गांधीबाग, तहसिल, नागपुर ३) इशांत नबी शेख, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३७/डी, वृंदावन नगर, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांची व त्यांचे ताब्यातील मोपेडची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात झिपलॉक पन्नीत एकुण २१.२०० ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी क्र. १) शाहनवाज शब्बीर शेख, वय २४ वर्षे, २) कमरूनिसा अन्सारी, वय ५० वर्षे, दोन्ही रा. मोठी मस्जीद जवळ, हसनबाग, नंदनवन, नागपुर यांचे मदतीने नमुद एम.डी. पावडर विक्रीकरीता आणल्याचे सांगीतले. तीन्ही आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०३ मोबाईल व एक सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड असा एकुण ३,१३,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करून, मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा. विवेक अढाऊ, शेख ईम्रान, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, नितीन साळुंके, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे व नितीन राठोड यांनी केली.

<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पथक पोलीसांची कामगीरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>

दिनांक २४.११.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे कोराडी हद्दीत गुन्हेगांराचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, इंदीरा प्रगती नगर, वार्ड नं.२, महादुला, नागपुर येथे राहणारा व हद्दपार असलेला आरोपी नामे अक्षय पाईकराव हा आपले राहते घरी आला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे घराबाहेर प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अक्षय रमेश पाईकराव, वय ३० वर्षे, रा. घटनास्थळ असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. १९/२०२६ दिनांक २१.१०.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने रात्रीचेवेळी वावरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस

अटक केली आहे. आरोपीस पुढील कारवाईकामी कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. नारायण पारवेकर, चंद्रशेखर भारती, पोअं. दिनेश महल्ले व सुनिलकुमार यादव यांनी केली.



(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे नंदनवन :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक १२.११.२०२६ चे १४.४० वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती छाया प्रकाश धुमरे, वय ४७ वर्षे, रा. शहापुर, जि. भंडारा, ह.मु.– प्लॉट नं. ४७३, दर्शन कॉलोनी, नंदनवन, नागपुर ह्या शहापुर येथुन नागपुर येथे त्यांचे घरी परत येत असतांना, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत जगनाडे चौक ते दर्शन कॉलोनी दरम्यान, ऑटोने प्रवास करतेवेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नजर चुकवुन, त्यांचे जवळील पर्समधील सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी ७० ग्राम एकुण किंमती २,६६,०००/–रू. चा मुद्देमाल असलेला चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिनांक २४.११.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. श्रीमती दिपाली गाठे ७८७५६९३०७७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.